॥ हरि ॐ॥

# श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्रम - श्रीसदगुरू पदचिन्ह महिमा

(पोस्टमधील भावार्थ फक्त जाणून घ्यावा.)

श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्रम.............
**साक्षात श्रीचण्डिकाकुलाचे वास्तव्य असणारे पवित्रस्थळ. जिथे केलेल्या भक्तीने, नामस्मरणाने अखंडपणे पुण्याची वृद्धी होत असते. श्रीसदगुरुतत्त्वाचे सगुण साकार सामीप्य मिळणे म्हणजे अनंत जन्माची पुण्याईच आणि या सगुण साकाराशी जन्मजन्मांतरीचे नाते, म्हणूनच जणू हा सहवास प्रत्यक्षात लाभला आहे.**

अशा या श्रीचण्डिकाकुलाचे दर्शन घेउन नतमस्तक झाल्यावर, मागे वळताच आपल्याला दर्शन होते ते या सगुण साकारांच्या चरणमुद्रांचे.

श्रीचण्डिकाकुलाचे दर्शन घेउन तृप्तीचा ढेकर द्यावा तर चरणस्पर्शाची स्वीट डिश समोर येते. पहाता क्षणी चेहऱ्यावर अस्फुट हास्य उमटते. कारण या परमात्म्यत्रयींचे, आपल्या आई, बाबा, मामांचे हसरे चेहरे आपोआप डोळ्यासमोर येतात. असे का बरे होते? कारण ........
**पादुका म्हणू मी कैशा । दिसती चक्रपाणि उभे ॥**

पण या पादुका नाहीत तर **मुद्रा** आहेत, म्हणजे त्यांच्या पावलांचे ठसे, **impressions.**

- ❖ **ठसे कधी उमटतात?**
  - ➢ जेव्हा खूप वेळ एकाच ठिकाणी स्थीर राहतो, तेव्हा ठसे उमटतात. मग ही परमात्मत्रयी तर २८ युगे आपल्यासाठी उभीच होती. पण आता मात्र दोन्ही हात पसरुन आपल्या लाडक्यांना साद घालीत आहेत.

**अशा या पदचिन्हांचे दर्शन.......**

१) आपण जेव्हा या पदचिन्हांचे दर्शन घेतो म्हणजे चरणावर मस्तक ठेवताना, इथेच माझ्या आराध्य देवता माझ्यासाठी बसल्या आहेत, असा भाव असतो तेव्हा आपोआप तिघांचा हसरा चेहरा समोर येतो. मग आपलेही हसु नकळत गालावर पाझरते.

२) मी मस्तक चरणांवर ठेवते तेव्हा नेमके काय होते? तर माझे आज्ञाचक्र त्या सदगुरुतत्त्वाच्या चरणांना स्पर्श करते तेव्हा त्या चक्रातून, माझ्या त्रिविध देहातील **त्रिताप** आणि माझे **पाप, प्रारब्ध** ते चरण खेचून घेतात आणि मला पाप व ताप मुक्त करतात. भक्तांच्या पापाच्या चिखलात ते चरण असतात म्हणूनच त्यांच्या चरणाना **चरणकमल** असे म्हणतात. कारण कमळ चिखलात असते. मग माझी ही आराध्य दैवते कोणत्या बरे चिखलात उभे आहेत? तर प्रत्येक भक्ताच्या प्रारब्ध पंकात म्हणजेच पापाच्या चिखलात उभे आहेत.

३) हे चरणस्पर्श माझे प्रभामंडळ व अंतर्मन शुद्ध करते. जर श्रीरामाच्या नखाच्या स्पर्शाने शिळा होऊन पडलेल्या अहिल्येचा उद्धार होतो तर मला वारंवार होणाऱ्या त्याच्या पदस्पर्शाने काय बरे मिळणार नाही? **फक्त माझा भाव तसा हवा**. हा भाव विश्वासाने प्रकटतो. म्हणूनच बापू नेहमी एकच सांगतात, **एक विश्वास असावा पुरता । कर्ता हर्ता गुरू ऐसा ।।**

४) आपण जेव्हा माथा टेकतो, म्हणजे इष्ट देवतेला शरण जातो. म्हणजे काय? तर स्वत:ला समर्पित करणे. हे समर्पण म्हणजेच .......

**" हे सदगुरु राया, माझे शेत मी तुला अर्पण करतो/करते. त्याची तु मशागत कर आणि त्यात माझ्या भक्तिरुपी बीजाची पेरणी कर. माझ्यातल्या द्वेषाला, मत्सराला, नागरुन, माझी मनरुपी जमीन स्वच्छ कर. माझ्यातील अहंकाराची ढेकळे फोड. तुझ्या नियमप्रांतरुपी उन्हात त्याची भाजणी कर आणि मग प्रेमाच्या वर्षावात न्हाऊ घालून, माझ्या भक्तीच्या**

**बीजांना अंकुर काढ. मगच खऱ्या अर्थाने माझ्या जीवनात आनंदाचे धान्य पिकेल."** अशी मनोमन प्रार्थना करणे.
(**असे शब्द जरी सुचले नाहीत तरी समर्पणाचा किमान भावही पुरेसा आहे.**)

८) आता आपण शेती सदगुरुंच्या स्वाधीन करणे म्हणजे काय ते पाहू.

**हे आहे श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्र**.
**क्षेत्र म्हणजेच शेत, माझे मनरुपी**.
माझ्या नीज देहरुपी शेतात (मन, प्राण, प्रज्ञेत )भक्तीचे बीज सदगुरु पेरतो. पण त्याआधी प्रवचनातुन मशागत रुपी मार्गदर्शन करतो. शेतात भक्तीसेवेने नांगरणी करून नको असलेले द्वेष/मत्सर काढून टाकतो. मग अहंकाराची ढेकळे फोडतो. आध्यात्म, आधार, पावित्र्य हेच प्रमाण या नियमाच्या कडक उन्हात शेताची जमीन सुलाखून घेतो. मग त्याच्या प्रेमाच्या वर्षावाने मृगाचा पाऊस पाडतो. या ओलाव्यातच भक्तीचे बीज रुजवले जाते. (म्हणून अंकुर फुटतो) हे सर्व गुरुच्या क्षेत्रात होते, म्हणजेच श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्रात.

**म्हणजेच त्यांच्या चरणकमलावर मस्तक रुपाने मनरुपी शेत अर्पण करुन शरणागत होणे. माझ्या मनाचे जेवढे क्षेत्र त्याला अर्पण करतो म्हणजेच त्याला जेवढी जागा देतो, तेवढे माझे प्रारब्ध सदगुरु पुसून टाकतात. म्हणूनच या क्षेत्रातील या चरणांच्या दर्शनाला व स्पर्शाला अनन्यसाधारण महत्त्व आहे**.

गुरूगीतेत एक श्लोक आहे......
**गुकारस्त्वं धकारस्य ।**
**उकारस्तेज उच्यते ।**
**अज्ञान ग्रासकं ब्रह्म ।**
**गुरुरेव न संशयः ॥**

गुरु शब्दातील **"गु"**अक्षर माझ्या जीवनातील अंधकार दूर करते तर **"रु"** अक्षर माझे जीवन प्रकाशमान करते. अशाप्रकारे जो माझ्या जीवनातील अभक्ती, विभक्ती, अहंकार व अज्ञानरुपी अंध:कार दुर करुन माझे जीवन **भक्तीमय** म्हणजेच खऱ्या अर्थाने प्रकाशित करतो, म्हणजेच माझ्या जीवनाचा विकास करतो, तोच खरा गुरु आहे यात शंकाच नाही.
असे हे श्रीअनिरुद्ध गुरुक्षेत्रम म्हणजे=
श्री = षडऐश्वर्ये संपन्न असलेले.
अनिरुध्द= माझे सदगुरु
गुरु= गु+रु - जे माझा जीवन विकास करतात
क्षेत्र= शेत ....गुरुचे क्षेत्र.

म्हणजेच माझे क्षेत्ररुपी जीवन
जेव्हा मी या गुरुच्या क्षेत्री चरण मुद्रांवर माथा टेकुन शरणागत होऊन समर्पित करते/करतो ....... तेव्हा.......
**काय सांगू देवा मी तव चरणांची महती ।**
**सुरवरांना जे लाभती ते भक्ता मिळती ॥**
अशी अवस्था भक्त अनुभवतो व माझा जीवनविकास सुरु होतो. कारण
**दर्शने सहजी हरेल फिकीर । भोग प्रखर नासती ॥**

६) या चरणांवर श्रद्धावान रामनाम वहीच्या लगद्यापासुन तयार केलेल्या त्रिविक्रम माळा अर्पण करतात.
ही रामनाम वही म्हणजे **यज्ञेन दानेन तपसा** मार्गातून सुरु केलेला प्रवास. त्यापासुन बनवलेली त्रिविक्रम चिन्हांची माळा म्हणजे माझे प्राण प्रज्ञा व मनाचे प्रतिनिधित्व करणारी तीन वर्तुळे. या तीन व्याहृती म्हणजे माझ्या व्यावहारिक असो वा आध्यात्मिक असो, प्रत्येक ठिकाणी माझा समग्र विकास साधण्यासाठी महत्त्वाच्या असतात. एकमेकांच्या अधिक जवळ आणून त्या हरिहराला माझ्या जीवनाच्या केंद्रस्थानी जागा करुन देणे, म्हणजे माझा जीव ते शिव प्रवास. अशी माळा अर्पण करण्याचे भाग्य इथे लाभते.

नंतर ह्या अर्पण केलेल्या माळा श्रीगोविद्यापिठम मध्ये अग्नी कुंडात अर्पण केल्या जातात व उदीप्रसाद रुपाने त्याची फलप्राप्ती होते. म्हणजेच काय तर **यज्ञेन, दानेन, तपसा मार्गाने स्वतःची उन्नती करुन घेणे हे श्रद्धावानाचे ध्येय, तर प्रसादरुपी उदी देउन त्यांचा विकास करणे हा सदगुरु संकल्प.**

७) श्रीहरिगुरूग्राम येथे वर्षातून एकदा होणाऱ्या अनिरुद्ध चालीसा पठणाच्या वेळी याच चरणमुद्रांचे विशेष दर्शन व स्पर्शाचा विशेष लाभ होतो. कारण इतर वेळी काहीही अर्पण करण्यास नसलेली मुभा इथेच शिथिल केली जाते आणि आम्ही आमच्या लाडक्या दैवतांना यावेळी तुलशी व बेलपत्र अर्पण करु शकतो.

८) श्रीगुरुपौर्णिमेसारख्या अतिपवित्र दिनी प. पू.बापुंच्या चरणमुद्रांचे हस्तस्पर्श व मस्तक ठेवून विशेष दर्शन घेता येते.

**अशा या चरणमुद्रांचा महिमा वर्णावा तेवढा थोडाच.**

**॥ सदगुरू श्रीअनिरुद्धार्पणमस्तू ॥**

॥ हरि ॐ ॥
॥ श्रीराम ॥
॥ अंबज्ञ ॥
॥ नाथसंविध् ॥
॥ जय जगदंब जय दुर्गे ॥

अंबज्ञ सौ. स्वातीवीरा जयंतसिन्ह कुडव